# मॅन्युअल – ४

## धोरणांची आखणी किंवा त्याच्या अंमलबजावणी संबंधात जनतेच्या प्रतिनिधीचा सल्ला किंवा त्यांचे प्रतिनिधीत्व करण्याबाबत विद्यमान व्यवस्थेचा तपशील

अधिनियम कलम ४ - महानगरपालिका अधिनियम कलम 4 अन्वये, महानगरपालिका अधिनियमांच्या विविध तरतूदी अमलात आणण्याचे काम खालील प्राधिका-यांकडे सोपविण्यात आले आहे.

(अ) महानगरपालिका

(ब) स्थायी समिती

(क) सुधार समिती

(ड) मुंबई विजपुरवठा व परिवहन समिती

(इ) शिक्षण समिती

(ई) विभाग समिती

(फ) महानगरपालिका आयुक्त

(ग) मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाचा महाव्यवस्थापक

कलम ५ (१) - महानगरपालिका ही (अ) प्रभाग निवडणूकांमध्ये निवडून आलेल्या दोनशे एकवीस पालिका सदस्यांची आणि (ब) महानगरपालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान अथवा अनुभव असलेल्या अशा, महानगरपालिकेने विहित पध्दतीने नामांकित केलेल्या (नॉमिनेटेड) पाच सदस्यांची बनलेली असेल, तथापि, वरील (ब) या उपक्रमाध्ये असलेल्या तरतूदींचा प्रभाव, १९९७ च्या निवडणूकीपासून लागू होईल. म्हणजेच सध्याची महानगरपालिका २२१ पालिका सदस्यांची आहे. तशीच तिची मुदत (पाच वर्षे) भरेपर्यंत राहील. ही मुदत निवडणूकीनंतर झालेलया पहिल्या तारखेपासून असेल.

कलम ५ (२) - महानगरपालिका ही "बृहन्मुंबई महानगरपालिका" या नावाचा एक निगम निकाय असेल. तिची अखंड अधिकार परंपरा असेल आणि सामायिक मुद्रा असेल.

**सही/**

कार्यकारी आरोग्य अधिकारी